Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

**Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed**


**Multidisciplinary International Research Journal**

SHIVAJI COLLEGE HINGOLI

FEBRUARY 2023

(CCCLXXXVIII) 388 (C)

## ENVIRONMENT : ISSUES, CHALLENGES AND SUSTAINABLE DEVELOPMENT



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

**Editor**
**Dr.Dhale S.U.**
Head Department of Political Sci.
Shivaji College, Hingoli
Tq.Dist.Hingoli (MS)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

| | | |
|---|---|---|
| 21 | पर्यावरणाचा ऱ्हास आणि शाश्वत विकास — डॉ.रेखा बालाजीराव पाटील | 7[illegible] |
| 22 | भारतातील कृषी क्षेत्रावरील हवामान बदलाचा परिणाम — प्रा. डॉ.शिवाजी पाते | 80 |
| 23 | पर्यावरणीय अर्थशास्त्र आणि शाश्वत विकासतील अडथळे — प्रा. देविदास गोकुळ गवळी | 84 |
| 24 | हवामानबदलाचे महाराष्ट्रातील शेतीवरील परिणाम एक अभ्यास — प्रा. डॉ. रेणुकादास यशवंत बोनर | 87 |
| 25 | वाढता विकास आणि पर्यावरणाचा असमतोल — प्रा. डॉ. रामदास धो.मुकटे | 93 |
| 26 | महाराष्ट्रातील पर्यावरण विषयक चळवळी — डॉ. रामभाउ भाकरे | 96 |
| 27 | शाश्वत विकास संकल्पना व स्वरुप — प्रा.डॉ. मदन लक्ष्मण शेळके | 100 |
| 28 | पर्यावरण संवर्धन आणि मानवी हक्काचे रक्षण एक समाजशास्त्रीय अध्ययन — दलित सुभाषराव कांबळे , प्रा. डॉ. दीपक सु.धारवाडकर | 104 |
| 29 | ग्रामीण साहित्यातील निसर्गदर्शन — प्रा डॉ श्रीराम मारोतराव कऱ्हाळे | 110 |
| 30 | पर्यावरण अभ्यास काळाची गरज — प्रा. डॉ. व्यंकटेश काळुराम मदनुरे | 114 |
| 31 | खेळाच्या माध्यमातून शाश्वत पर्यावरणाचा प्रचार- प्रसार आणि पर्यावरण संतुलन - एक अभ्यास — प्रा. डॉ.गुणाजी पांडुरंग नलगे | 117 |
| 32 | मराठी साहित्यातून आलेले पर्यावरण भान — प्रा.डॉ. संगीता मुंढे | 120 |
| 33 | रंगनाथ पठारे यांच्या कथेतील व्यक्तिरेखांचे चित्रण — प्राचार्य डॉ.नागनाथ पाटील ,केशव विठ्ठल कोकाटे | 124 |
| 34 | नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन व नैसर्गिक संसाधनांवर होणाऱ्या परिणामांचे अध्ययन करणे. — कु. अश्विनी रोहिदास भोईर, | 128 |


SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXXVIII ) 388- C
ISSN : 2278-9308
Fabruary, 2023

# खेळाच्या माध्यमातून शाश्वत पर्यावरणाचा प्रचार- प्रसार आणि पर्यावरण संतुलन - एक अभ्यास

प्रा. डॉ.गुणाजी पांडुरंग नलगे
क्रीडा संचालक, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली
मो.नं.9420038008 ई-मेल-nalgegp21@gmail.com

SHIVAJI COLLEGE HINGOLI

सारांश :

मानवासाठी शारीरिक हालचाली, कवायती, कसरती करणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच महत्त्वाचे पर्यावरणाचे संतुलन राखणे. पर्यावरणाचे संतुलन विघडले तर मानवी जीवन धोक्यात यायला वेळ लागणार नाही. पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची काळजी घेणे प्रत्येक मानवाचे कर्तव्य आहे. असे म्हणतात की निरोगी खेळासाठी निरोगी वातावरण आवश्यक आहे. कोणत्याही क्रीडा स्पर्धा आयोजनासाठी चांगल्या वातावरणाची गरज असते. खेळाडूला खेळताना ऑक्सिजनची जास्त गरज असते. जास्तीत जास्त शुद्ध ऑक्सिजन निर्मितीसाठी चांगल्या वातावरणाची आवश्यकता असते. खेळाडूला जितका चांगल्या ऑक्सिजनचा पुरवठा जास्त तितका खेळाडूचा परफॉर्म चांगला होतो. क्रीडा स्पर्धाच्या आयोजननामुळे ध्वनी प्रदूषण होते, क्रीडा साहित्य निर्मितीमुळे वातावरणात प्रदूषण होते. जगातील प्रत्येक मानसाला खेळाची आवश्यकता वाटत आहे. अनेकांना कोणत्या ना कोणत्या आजाराने ग्रासले आहे. निरोगी शरीर आणि मन राहण्यासाठी निसर्गाच्या सानिध्यात चांगल्या वातावरणात खेळ होणे आवश्यक आहे त्यासाठी निरोगी निसर्गाची आवश्यकता आहे. अतिखेळामुळे, अतिस्पर्धामुळे आणि क्रीडासाहित्य निर्मितीमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होऊ शकतो. त्यामुळे शाळा महाविद्यालयांना, व्यावसायिक संघटनांना आता शाश्वत पद्धतीचा अवलंब करून खेळाला पर्यावरणीय बदलासाठी तयार करावे असे वाटत आहे. जगातील करोडो लोक खेळ पाहतात खेळतात त्यासाठी एकत्र येतात, ऑलम्पिक सारख्या एखाद्या मोठ्या स्पर्धेचे आयोजन केल्यानंतर त्या ठिकाणी लाखो लोक एकत्र जमतात. त्यामुळे वातावरणात प्रदूषण वाढते यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो जागतिक स्तरावरील फुटबॉल, क्रिकेट स्पर्धांच्या आयोजनादरम्यान वातावरणाचा ऱ्हास होतो. पर्यावरण चांगले राहण्यासाठी शाश्वत खेळांना प्राधान्य देऊन खेळाच्या माध्यमातून प्रचार आणि प्रसार करावा लागेल तेव्हाच पर्यावरणाचे संतुलन राहील.

मुख्यशब्द :- खेळ, शाश्वत, पर्यावरण, प्रचार, प्रसार, संतुलन.

**प्रस्तावना:-**

धकाधकीच्या जीवनात प्रत्येक मनुष्य कोणता ना कोणता व्यवसाय करत आहे, नोकरी करत आहे, त्यामुळे आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यायला वेळ मिळत नाही किंवा आरोग्याकडे गांभीर्याने बघत नाहीत. मानवाच्या अमर्याद गरजा वाढत आहेत, अति हव्यास, अवास्तव महत्त्वाकांक्षा यामुळे नव नवीन शोध लागत आहेत. या शोधातून काही चांगले तर काही पर्यावरणासाठी हानिकारकही निर्माण होत आहे. जागतिक स्पर्धा वाढली आहे, औद्योगिक क्षेत्र वाढत आहे, कारखानदारी वाढली आहे, साम्राज्यवाद वाढत आहे. कोणीच स्वतःला कमी समजायला तयार नाही प्रत्येक जण दुसऱ्यावर कुरघुडी करण्याचा प्रयत्न करत आहे. यातून कारखाने, औद्योगिक क्षेत्र, रासायनिक प्रदूषण, औष्णिक प्रदूषण वाढत आहे. त्यामुळे तापमानात वाढ होत आहे तापमानातील वाढीचे परिणाम वातावरणातील पर्यावरणावर होत आहेत. पर्यावरणाचे संतुलन बिघडत आहे. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी प्रत्येक मानवाला आपल्या अमर्याद गरजा कमी कराव्या लागतील. अती महत्त्वाकांक्षा कमी करावी लागेल. निसर्गाची हानी न होता शाश्वत जीवन जगण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. जास्तीत जास्त ऑक्सिजन निर्मितीसाठी झाडांची संख्या वाढविणे गरजेचे आहे त्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. या सोबत शासनाने कडक कायदा करावा यासाठी की प्रत्येकाने झाडे लावावी झाडे जगवावी. पर्यावरण हानी होणार नाही,

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

पर्यावरणात असंतुलन निर्माण होईल अशा कार्यक्रमावर, व्यवसायावर बंदी घालावी याचा प्रचार आणि प्रसार खेळाच्या माध्यमातून चांगला करता येईल.

अभ्यासाची उद्दिष्टे:-

1) खेळ, क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून शाश्वत पर्यावरणासाठी प्रचार करणे.

2) पर्यावरणाचे संतुलन राहण्यासाठी लोकालोकात प्रसार करणे.

3) सद्यस्थितीतील पर्यावरणाचा अभ्यास करणे.

4) पर्यावरण रक्षणासाठी शासनाच्या धोरणांचा, कायद्याचा आढावा घेणे.

SHIVAJI COLLEGE •HINGOLI•

गृहीतके :-

1) खेळाडूंना खेळ खेळताना शुद्ध पर्यावरणाची गरज आहे.

2)पर्यावरणातील प्रदूषणाचा लोकांना त्रास होत आहे.

3) पर्यावरणाची हानी रोकण्यासाठी कडक कायद्याची गरज आहे.

संशोधन पद्धती:-

पेपर साठी सरकारी अहवाल, मासिके, वृत्तपत्रे, वेबसाईड दुय्यम डाटा गोळा करण्यासाठी वापरली आहे.

विषयाची मांडणी:-

जगात अनेक प्रकारचे खेळ खेळल्या जात आहेत. नवनवीन खेळांचा शोध लावला जात आहे पारंपारिक खेळाकडे मागास खेळ म्हणून बघितले जात आहे. त्यामुळे संशोधनातून नवीन खेळांचा उगम होत आहे. प्रत्येक खेळाकडे स्पर्धात्मक दृष्टीने बघितले जात आहे त्यामुळे खेळाला व्यावसायिक स्वरूप आले आहे. व्यवसाय म्हटले की स्पर्धा आली आणि स्पर्धा म्हटले की नफा तोटा येतो. यामध्ये आपल्या फायद्यासाठी दुसऱ्याचे नुकसान झाले तरी जमते. याच न्यायाने आर्थिक फायदा होण्यासाठी, मान सन्मान वाढण्यासाठी, पदके, पुरस्कार मिळण्यासाठी मोठ्या प्रमाणावर स्पर्धांचे आयोजन केल्या जात आहे. जागतिक स्तरावरील स्पर्धा, ऑलम्पिक स्पर्धा, फुटबॉल सारख्या स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा यासाठी प्रचंड मोठा जनसमुदाय एकत्र येत आहे. त्यामुळे त्या ठिकाणी प्रदूषण वाढत आहे, ध्वनी प्रदूषण वाढत आहे. साहित्य निर्मितीसाठी मोठमोठ्या कारखान्याची निर्मिती होत आहे. अशा स्पर्धांमुळे अनेक प्रकारचे प्रदूषण वाढत आहे. या आर्थिक स्पर्धेच्या युगात पारंपारिक खेळाकडे जाणून बुजून दुर्लक्ष केल्या जात आहे। भारतीय खेळांना जास्तीत जास्त प्राधान्य देऊन पर्यावरणाची जोपासना कशी करता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे. मोठ्या क्रीडा स्पर्धांमुळे ध्वनी प्रदूषण मोठ्या प्रमाणावर होते, पाणी प्रश्न निर्माण होतो. ज्या ठिकाणी स्पर्धेचे आयोजन करायचे किंवा क्रिकेट सारखी मैदाने तयार करायची त्या ठिकाणी वृक्षतोड करावी लागते. जमीन वापरात आल्यामुळे बीजोत्पादनक्षम राहत नाही निर्जीव बनते. स्पर्धांमुळे वेस्टेज अन्न, प्लास्टिक ग्लास, इतर वेस्ट साहित्याची विल्हेवाट लावणे योग्य पद्धतीने झाले नाही तर पर्यावरण प्रदूषण वाढते, पर्यावरणाची हानी होते. पर्यावरणासमोरील आव्हाने कमी करण्यासाठी आणि शाश्वत पर्यावरण निर्माण करण्यासाठी पर्यावरण पूरक कार्यक्रमांचे आयोजन करावे लागेल. व्यावसायिक क्रीडा स्पर्धांमुळे भांडवलशाही वाढत आहे. भांडवलशाही चा नियम आहे की काही मिळवण्यासाठी काही गमवावे लागते. वाटेल ते तयार करा आणि वाटेल तशे वापरा. त्यामुळे पर्यावरणाचे नियम पायदळी तुडवले जाणार. वाटेल ते करा यामुळे पर्यावरणाची हानी अटळ आहे. वाढत्या आधुनिकीकरणाचा, भांडवलशाहीचा परिणाम हा पर्यावरनावर वाईटच होणार आहे. खेळाच्या माध्यमातून लोकालोकांत समाजात पर्यावरण संरक्षणाचा संदेश गेला पाहिजे. गांधीजी म्हणत होते खेड्याकडे चला तो संदेश पर्यावरणाची हानी रोकणारा आहे. पारंपारिक खेळ भारतात खूप मोठ्या प्रमाणावर आहेत या खेळांना तंत्रशुद्ध नियमावली आहे असे वाटत नाही. या भारतीय पारंपरिक खेळांना काटेकोर नियमावलीत बसविले, नियमबद्ध, साचेबद्ध तयार केले तर यांना पण जागतिक स्तरावर श्रेष्ठत्व प्राप्त होऊ शकते. उदाहरणात विटी दांडू, आट्यापाट्या, चेंडू फळी, साहसी खेळामध्ये झाडावरील डाफ असे अनेक खेळ आहेत हे भारतीय खेळ पर्यावरण पूरक आहेत. यांनी पर्यावरणाची हानी होत नाही. कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होत नाही. आता शासनाकडून पर्यावरण विषयक



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli (MS.)
391

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Referred Indexed Multidisciplinary International Research Journal

Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXVIII ) 388- C

ISSN : 2278-9308
Fabruary, 2023

जागरूकता निर्माण केली जात आहे. पर्यावरण विभागाकडून प्रदूषणावर नियंत्रण ठेवले जात आहे. केंद्र शासनाने या संदर्भात अधिनियम तयार केले असून त्याची अंमलबजावणी महाराष्ट्र शासन करत आहे. पर्यावरण प्रदूषण नियंत्रणासाठी मुनार्गी पेक्षा जलमार्गा चा अवलंब केल्यास प्रदूषण नियंत्रणात येईल. पर्यावरणाचे रक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. उद्योगांनी आपल्या घनकचऱ्याचे नियोजन केले तर प्रदूषणावर नियंत्रण राहील. स्वयंसेवी संस्थांना, उद्योगांना प्रोत्साहित करण्यासाठी शासनामार्फत पुरस्कार बक्षिसे दिले जात आहेत. शासनाने शाळा, महाविद्यालयात पर्यावरण पूरक, नैसर्गिक खेळांना प्राधान्य देऊन तसे नियम तयार केले पाहिजेत. तसा कायदा तयार केला पाहिजे. ज्या खेळामुळे कमीत कमी प्रदूषण होईल त्या खेळाला सन्मानित केली पाहिजे. शाळा, महाविद्यालय स्तरावर पर्यावरण विषय सक्तीचा करुन त्याची अंमलबजावणी योग्य रितीने केली पाहिजे. शाळा, महाविद्यालयात पर्यावरण विषयक ऑडिट झाले पाहिजे. त्याचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणावर केला पाहिजे.

" शाश्वत विकास म्हणजे भावी पिढ्यांच्या गरजांना धोक्यात न आणता वर्तमानातील लोकसंख्येच्या गरजा पूर्ण केल्या जाऊ शकतील' असे आयोगाने प्रतिपादन केले. माणूस हा पर्यावरणाचा एक भाग आहे. माणसाच्या बदलत्या राहणीमानामुळे निसर्गाची चक्र बदलत आहे. प्रत्येक माणसाने पर्यावरणाचे संतुलन न बिघडवता पर्यावरणाशी जुळून घेऊन राहणे गरजेचे आहे. असे आपण नैसर्गिक खेळाचा अवलंब करून आणि पर्यावरण पूरक खेळ आणि स्पर्धांचे नियोजन करून पर्यावरणाचे संतुलन राखू शकतो. प्रत्येक घटकाला आपापल्या मर्यादा माहीत झाल्या आणि एकमेकांचा आदर केला की निसर्गाचे संतुलन राखले जाते. खेलो इंडिया विद्यापीठ स्तरीय क्रीडा स्पर्धा देऊन " हरित खेळ एक वेगळी दिशा देणारा आहे कारण तुम्ही केवळ खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी वचनबद्ध नाही तर पर्यावरणाच्या रक्षणासाठी वचनबद्ध आहात." खेळाच्या मैदानाबाहेर खेळामध्ये वापरल्या जाणाऱ्या सर्व गोष्टी पुन्हा वापरता येण्याजोग्या साहित्य पासून बनवल्या जातील, शिवाय वाहतुकीसाठी इलेक्ट्रिक वाहने वापरली जातील आणि प्रत्येक ठिकाणी सर्व कचरा ओला आणि सुका म्हणून वेगळा केला जाईल असा निर्णय घेण्यात आला आहे. असे निर्णय क्रीडा क्षेत्रात घेणे पर्यावरणाचे संतुलन राहण्यासाठी गरजेचे आहे.

निष्कर्ष :-

प्रत्येक व्यक्तीला जगण्यासाठी शाश्वत पर्यावरणाची गरज आहे. पर्यावरण प्रदूषण होणार नाही, प्रदूषण होईल अशा साहित्याचा वापर टाळणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. शासनाने प्रदूषण रोखण्यासाठी कडक निर्बंध लादण्याची गरज आहे. प्रदूषण निर्माण करतील अशा उद्योगांना, अशा खेळांना, व्यवसायाला परवानगी नाकारण्याची गरज आहे. शाश्वत पर्यावरण निर्माण निर्मितीसाठी समाजातील प्रत्येक घटकाने शासनाने फार मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करण्याची गरज आहे. शाळा, महाविद्यालयात पर्यावरण विषय अनिवार्य करून चालणार नाही तर त्याची कडक अंमलबजावणी झाली पाहिजे. त्यासाठी पूर्ण वेळ शिक्षकाची, प्राध्यापकाची नेमणूक करण्याची गरज आहे. तेव्हाच आपल्याला आवश्यक असलेले पर्यावरणा विषयी चांगले परिणाम दिसून येतील.

संदर्भ ग्रंथ -

1)https://and.ncsu>news>2020/11

2)http://mns blueprint.org

3) https://m.facebook.com>photos

4) https://www.loksatta.com>environment

5) http://mns blueprint.org

6) https://pin.gov.in>press releasepage

7) https://mr.vikaspedia.in>environment

SHIVAJI COLLEGE HINGOLI

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)